**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल
हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गोपाळ निवृत्ती दसवडकर
मु.वरसगाव गोरडवाडी, पो.कुरण, ता.वेल्हे, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, ता.वेल्हे, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत वरसगाव, ता.वेल्हे, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१५ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गोपाळ निवृत्ती दसवडकर
मु.वरसगाव गोरडवाडी, पो.कुरण, ता.वेल्हे, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, ता.वेल्हे, जि.पुणे प्रतिनिधी श्री.ए.बी.मदने

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत वरसगाव, ता.वेल्हे, जि.पुणे श्री.एस.पी.उदुगडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००१ ते २००६ या कालावधीमध्ये ग्रामस्थांकडून दरवर्षी कररुपाने पैसे घेतले जात आहेत त्याची माहिती. वीज व्यवस्था गेल्या पाच वर्षापासून बंद आहे, तरीही वीजकर जमा केला आहे, तो किती आहे व मागणी केल्यावर तो ग्रामस्थांना परत देणार काय? २००६ सालातील रस्त्याच्या कामाबद्दल पंचायतीची परवानगी घेतली होती काय? घेतली असल्यास त्याची प्रत. पंचायत सभासदांची तीन महिन्यांनी मिटींग होते का व त्या मिटींगला सर्व सभासद हजर राहतात का याची माहिती. नळकोंडाळे बांधून मिळावे ह्यासाठी ग्रामस्थांच्या सह्यानिशी दोन अर्ज पंचायतीकडे पाठविले आहेत परंतु पंचायतीने अर्जाची दखल पत्रव्यवहार वा पाहणी केली का, कारण द्यावीत. तरी ग्रामपंचायतीचा वार्षिक जमा-खर्च व झालेली विकास कामे असा २००१ ते २००६ पर्यंतची तपशिलवार माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.गोपाळ निवृत्ती दसवडकर यांनी मागितलेली माहिती ग्रामपंचायत वरसगावच्या संदर्भातील आहे. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, वरसगाव यांनी आपल्याला विहित मुदतीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीचे पत्र वेळेत मिळू दिले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वेल्हे यांनी स्वत: सुनावणी न घेता कनिष्ठ अधिकाऱ्यांकरवी सुनावणी घेतली. ग्रामपंचायतीच्या जमाखर्चाची माहिती सुनावणीच्या दिवशीच दिली. परंतु ती अपूर्ण व दिशाभूल करणारी होती, अशा कारणांवरुन श्री.दसवडकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.दसवडकर यांनी माहिती मागितली तेव्हा श्री.सी.जी.चव्हाण हे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक वरसगाव होते. त्यांनी विहित मुदतीत माहित दिली नाही असे श्री.दसवडकर याचे म्हणणे आहे. परंतु त्यांनी प्रामुख्याने खुलासे, स्पष्टीकरण अशा स्वरुपाची विचारणा केली आहे. तसेच जर-तर च्या गृहितांवर आधारित संभाव्य कृतीबाबतही विचारणा केली आहे. विकास कामांची माहिती त्यांना द्यावी, असा आदेश प्रथम अपिलाची सुनावणी घेणाऱ्या कनिष्ठ अधिकाऱ्याने ग्रामसेवक श्री.चव्हाण यांना दिला. त्यानुसार श्री.चव्हाण यांनी विकास कामांची माहिती समक्ष दिली, असे श्री.ए.बी.मदने, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वेल्हे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. मात्र आपल्याकडून माहिती देण्यास विलंब झाला नसून आपल्याला श्री.दसवडकर यांनी मोकळे पाकीट पाठविले होते, त्याचा पंचनामा आपण केला आहे, असे श्री.चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांपुढे नमूद केले आहे. श्री.चव्हाण व श्री.दसवडकर यांनी परस्परांवर विविध प्रकारचे आरोप-प्रत्यारोप केले असल्याचे कागदपत्रांवरुन दिसते.

लेखा परीक्षणाची कागदपत्रे श्री.दसवडकर यांनी सादर केली. त्यात पैसे जमा दाखविलेले नाहीत म्हणजेच जमाखर्चाची माहिती चुकीची दिली आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

श्री.दसवडकर यांनी खुलासा, स्पष्टीकरण, आगामी काळातील संभाव्य कृती अशा स्वरुपाची विचारणा केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेनुसार ती माहिती ठरत नाही. त्यामुळे ती न देण्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांना दोषी धरता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) जमाखर्चाची माहिती चुकीची असल्याचे अपीलकर्त्याचे प्रतिपादन मूळ कागदपत्रानुसार तपासून त्याबाबतचा अभिप्राय अपिलीय प्राधिकारी तथा

गटविकास अधिकारी यांनी दि.२५.९.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची एक प्रत अपीलकर्त्यास पाठवावी.

(३) अपिलीय प्राधिकाऱ्यांनी स्वतःच अपिलाची सुनावणी घेणे आवश्यक आहे. कनिष्ठ अधिकाऱ्यांकडे ते काम सोपविता येणार नाही, याची समज तत्कालीन गटविकास अधिकारी श्री.अशोक पावडे यांना देण्यात येत आहे. तसेच विस्तार अधिकाऱ्यांकरवी अपिलाची सुनावणी घेण्याबाबतचा खुलासा गटविकास अधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२५.५.२००८ पर्यंत आयोगला सादर करावा, असे आदेश आयोगाने विस्तार अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.ए.व्ही.मदने यांच्याद्वारे सुनावणीच्या वेळी दिले होते. आज दि.१०.९.२००८ पर्यंत असा खुलासा सादर न केल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी तत्कालीन गटविकास अधिकारी श्री.अशोक पावडे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन त्याचा अहवाल दि.१५.१०.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१०.९.२००८**

सप्टेंबर-०८-८-११

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल झालेल्या द्वितीय अपिलामध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २२१७ / पुणे | श्री.विश्वजीत सदाशिव आबनावे, १७५८/१, चिंचेची बाग, कडेपठार रोड, जेजुरी, ता.पुरंदर जि.पुणे | शिरस्तेदार, उप विभागीय अधिकारी, पुणे उपविभाग पुणे | उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे | उपविभागीय अधिकारी, पुणे यांनी आरटीएस/अपील क्र.२३२/२००६ अन्वये दिलेल्या निकालाची कायद्यावर आधारित कारणमिमांसा व तद्अनुषंगिक मुद्दयांची माहिती |
| २ | २३०६ / पुणे | श्री. अशोक गिरीधारीलाल लोढा, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे | माहिती अधिकारी, आळंदी नगर परिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे | मुख्याधिकारी, आळंदी नगर परिषद, आळंदी देवाची, ता. खेड, जि.पुणे | १. आळंदी नगर परिषदेच्या निवडणुकीत भरलेली अनामत रक्कम रू.५००/- वेळेत परत न केल्याबद्दल<br>२. विहित वेळेत संकलित कर भरूनही जाणीवपूर्वक बदनामी करण्यासाठी 'प्रभात' दैनिकामध्ये नाव जाहीर करणेबाबत |

उपरोक्त अपिलांमध्ये मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे 'माहिती' नसून खुलासा अथवा प्रशासकीय कार्यवाहीची मागणी आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या निकालपत्रात त्याविषयी दखल घेतली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

वरील अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २२.९.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१ व २२.०८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे - नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २२४ /सातारा | श्री. लियाकत अमीर मोमीन शनिवार पेठ, नेहरू नगर, संगम हॉटेल मार्ग, कराड, जि.सातारा | तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, कराड, जि. सातारा | अधीक्षक भूमी अभिलेख, सातारा | मौजे करा़ड भू.मा.क्र. ३५९/ब सन १९६१ साली टी.पी.स्कीम लागू झाल्या-नंतर गेलेले क्षेत्र वगळून बाकी क्षेत्राचा लागूपुरता फाळणी नकाशा व इतर तद्अनुषंगिक माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले |
| २ | २३३ /सातारा | श्री. संपतराव लक्ष्मण सावंत फिनिक्स, ५३/५ अ, शिवाजीनगर, संगमनगर, सातारा | अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, तहसील कार्यालया जवळ, सातारा. | उप संचालक भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, शासकीय बंगला नं. ८, शास्त्री-नगर, जेल रोड, येरवडा, पुणे-६ | मोजणी टिपण फाळणी प्रमाणे मोजणी न केल्यास कारवाई काय केली जाते, कोण करते, सुपर निमताना चौकशीनंतर त्यांचे पैसे लगेच भरून न घेता सहा महिन्यानंतर भरून घेतले जातात, या बाबतची माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्यांचे समाधान झाले |
| ३ | २५७ / सातारा | सौ. मंगला विनायक सिधये, ८, लक्ष्मीनगर, फलटण, जि सातारा | विशेष भूमी संपादन अधिकारी क्र .१९ सातारा, जि.सातारा | विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१९, एस. टी स्टँडसमोर, सातारा | मौजे करवली (२ क) येथील स.नं./ग.नं. १९/१ या जमिनी बाबतचा सानुग्रह अनुदान मुल्यांकनाच्या सुधारित फेर प्रस्तावाबाबतची माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्यांचे समाधान झाले |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २५८ /सातारा | श्री. संपतराव लक्ष्मण सावंत, रा. फिर्निक्स, ५३/५ अ, शिवाजीनगर, संगमनगर, सातारा | तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सातारा | अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा | मौजे लिंब ता. सातारा येथील स.नं. १०८८ ची मूळ फाळणी नक्कल व टिप्पणी व तद्अनुषंगिक बाबतची माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| | २६६ /सातारा | डॉ. दिलीप सिताराम देशपांडे, मालोजी नगर, कोळकी, ता. फलटण, जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार, फलटण, जि.सातारा | तहसीलदार, फलटण, जि.सातारा | सन १९९० पासून रास्तभाव दुकानदारांची नावानिशी सहीशिक्याची यादीची प्रत, सन १९९० पासून त्या त्या महिन्यात शिल्लक राहिलेल्या मालाची यादी, मालाचा उपयोग, लोकांकडून घेतला जाणारा आकार व त्याचे दरपत्रक, इ. तसेच तद्अनुषंगिक माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ६ | २७८ /सातारा | श्री. प्रल्हाद मारुती भिलावे ४८, रघुनाथपुरा पेठ, सातारा शहर जि. सातारा | नगर भूमापन अधिकारी, सातारा | अधीक्षक भूमि अभिलेख, सातारा | सिटी सर्व्हे नं.२५ब च्या चारही बाजूंच्या रस्त्याची रूंदी फूटामध्ये किती आहे याची माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले |
| ७ | ३०२ /सातारा | श्री. बाळकृष्ण धोंडीबा गुजर मु. पो. बनघर, ता. जि. सातारा | उप विभागीय अधिकारी, सातारा उप विभाग, सातारा | अप्पर जिल्हाधिकारी, सातारा, जि. सातारा | उरमोडी प्रकल्पातील बुडीत १०.५ टीएमसी क्षेत्रामध्ये मौजे परळी वगैरे गावाची जमीन, घर तद्गंभूत वस्तुसह तसेच १९९६ ते २००७ अखेर मंजूर रकमेतून एकूण किती रकमेचे वाटप केले व शिल्लक गावनिहाय वापर याची माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३२७ /सातारा | श्री. जितेंद्र कृष्णराव नाईक निंबाळकर मु. पो. वाठार निंबाळकर, ता. फलटण, जि. सातारा | उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण, जि. सातारा | अपर जिल्हाधिकारी, सातारा, जि. सातारा | अप्पर आयुक्त, पुणे यांचेकडील अपील क्र.३१७/२००० ची छायांकित प्रत व उप विभागीय अधिकारी, फलटण यांचेकडील आदेश क्र.भूंस/एसआर /कावि/११३९ दि. ६.११.२००० ची प्रत याबाबत माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |

विशेष अपील निर्गत कार्यक्रमामध्ये दि.२१ व २२.०८.२००८ रोजी वर नमूद केलेल्या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी परस्परांशी विचारविनिमय करुन अपेक्षित माहितीबाबत निष्कर्ष नमूद करावा असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे. त्यानुसार या घटकांमधील चर्चेअंती माहितीबाबत एकमत होऊन अपील निकाली काढण्याबाबत उभय बाजूंचे एकमत झाल्याचे प्रपत्रात लेखी नमूद केले आहे. चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ६.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुधीर माधव जोशी<br>बिल्डिंग नं.२, फ्लॅट नं.१५, ५८७, दत्तप्रसाद<br>सोसायटी, पुणे सिंहगड रोड, पुणे-३० | गैरहजर |
| ३ | जा माहिती अधिकारी | कै. व्ही.जी.जोशी जनरल ट्रस्ट, नारायण पेठ, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कै. व्ही.जी.जोशी जनरल ट्रस्ट, नारायण पेठ, पुणे | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. सुधीर माधव जोशी यांनी जन माहिती अधिकारी तथा विश्वस्त कै. व्ही.जी.जोशी जनरल ट्रस्ट, पुणे यांच्याकडे ट्रस्टींची नावे, ट्रस्टींच्या मालमत्ता व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

ट्रस्टला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नाही. अपीलकर्त्यास माहिती देण्याचा प्रश्न येत नाही, असे प्रतिपादन विश्वस्त, कै. व्ही.जी.जोशी जनरल ट्रस्ट, यांनी दि. १७.१२.२००७ रोजीचे निवेदनाद्वारे केले आहे.

अपीलकर्त्यास संबंधित माहितीसाठी धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधता येऊ शकतो. मात्र ढोबळ व विस्तृत माहिती मागितली असून त्यात सार्वजनिक हिताचा विषय दिसत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य.

**पुणे**
**दि.** ११.९.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.२१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५ / सातारा | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. शंकर रामचंद्र माळवदे,<br>४४३, सदर बाजार, कमला चेंबर,<br>पो. सातारा-४१५ ००१ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी, सातारा नगरपालिका, सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपायुक्त (नगर पालिका प्रशासन), पुणे विभाग, विधान भवन, पुणे-१ | गैरहजर |
| ५ | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७२७ दि. १०.१०.२००५ तसेच ठराव क्र.८३५ दि. २६.६.२००६ रोजी झालेल्या ठरावाच्या दिनांकापासून दि. ४.१.२००७ अखेर पर्यंतची मागितलेल्या मुद्द्यांवरील माहिती | |

माहितीबाबत झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांच्यामध्ये अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १६.९.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. २१.८.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४५ / सातारा | अध्यक्ष, राजवैभव प्रतिष्ठान, औंध, ता.खटाव, जि.सातारा | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (दक्षिण), जिल्हा परिषद सातारा | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा, जि.सातारा | औंध ता. खटाव, जि. सातारा येथील विविध कामाचे ठिकाणी मार्गदर्शक फलक बसविणे व तद्अनुषंगिक कार्यवाही बाबतची माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| २ | २०० / सातारा | श्री. शिवराम देवाजी उबाळे रा. ल्हासुर्णे, ता. कोरेगाव, जि.सातारा | ग्रामसेवक, गामपंचायत, ल्हासुर्णे ता.कोरेगाव, जि. सातारा | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कोरेगाव, जि. सातारा | गट विकास अधिकारी पंचायत समिती कोरेगांव यांचेकडील दि. २८.१.२००५ च्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतच्या अहवालाची प्रत तसेच तद्अनुषंगिक इतर माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ३ | १९६ / सातारा | श्री. रविंद्र यशवंत जगदाळे, मु.बोथे,पो.कळक-जाई, ता. माण, जि. सातारा | ग्रामसेवक ग्रामपंचायत, बोथे, ता. माण, जि. सातारा | गटविकास अधिकारी, मु.पो.दहिवडी ता. माण, जि.सातारा | मौजे बोथे पो. कळकजाई ता. माण, जि. सातारा येथील गट नं.६९० मधील २६X४० पत्रा शेड नोंद उताऱ्याची माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १६१ / सातारा | श्री. बाबुराव भगवंतराव गायकवाड मु.पो.लोहोम ता.खंडाळा जि. सातारा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा, जि. सातारा | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा जि. सातारा | ग्रामपंचायत लोहोम कडील जा.नं.परूदव/ अशा/२/कावि /३०७/०६ दि. ९.१०.२००६ चे पत्राची नक्कल प्रत मिळणेबाबत | माहिती अपीलकर्त समाधान झाले. |
| ५ | १३७ / सातारा | श्री. सुभाष एकनाथ साळुंखे, मु.पो.देगाव (पाटेश्वर) ता.जि. सातारा | मुख्याध्यापिका, श्रीपतराव पाटील हायस्कूल, करंजेपेठ, सातारा जि. सातारा | शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद सातारा, ता.जि.सातारा | श्री. साळुंखे यांच्या वरिष्ठ श्रेणी प्रस्तावातील सर्व कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती व भविष्य निर्वाह निधीच्या सन १९८४ ते २००६ अखेरच्या मूळ प्रती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ६ | ९६ / सातारा | श्री. बाबुराव भगवंतराव गायकवाड मु.पो.लोहोम ता.खंडाळा जि. सातारा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा, ता.खंडाळा, जि. सातारा | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा, सातारा | श्री. पी. ए. ढोले विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती, खंडाळा यांनी तयार केलेल्या दोन्ही केसच्या चौकशी अहवालाच्या प्रती बाबतची माहिती | माहिती ब[illegible] अपीलकर्त्या[illegible] समाधान झाले. |
| ७ | ९५ / सातारा | श्री. बाबुराव भगवंतराव गायकवाड मु.पो.लोहोम ता.खंडाळा जि. सातारा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा, ता. खंडाळा, जि. सातारा | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा, जि. सातारा | पंचायत समिती खंडाळा यांचेकडील दि. ४.९.२००६ व दि. १६.१०.२००६ रोजी झालेल्या चौकशी अहवालाच्या प्रती मिळणेबाबत माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ८ | ५४ / सातारा | श्री. बाबुराव भगवंतराव गायकवाड मु.पो.लोहोम ता. खंडाळा जि. सातारा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा, ता.खंडाळा, जि. सातारा | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा सातारा | लोहोम गावठाण मिळकत नंबर १६६ व १६७ संबंधीची व तद् अनुषंगिक मुद्दयावर मागितलेली माहिती | माहिती ब[illegible] अपीलकर्त[illegible] समाधान झाले. |
| ९ | ३२२ / सातारा | श्री. विजयसिंह बाबुराव घोरपडे १८६, रविवार पेठ, सातारा | माहिती अधिकारी, रयत शिक्षण संस्था, सातारा | अपिलीय प्राधिकारी, रयत शिक्षण संस्था, सातारा | लैंगिक छळ प्रतिबंधक कक्ष शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी दिलेल्या निर्णयाच्या अहवालानुसार द्यावयाच्या हमीपत्राच्या प्रतीची माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |

विशेष अपील निर्गत कार्यक्रमामध्ये दि. २१.०८.२००८ रोजी वर नमूद केलेल्या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी परस्परांशी विचारविनिमय करुन अपेक्षित माहितीबाबत निष्कर्ष नमूद करावा असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे. त्यानुसार या घटकांमधील चर्चेअंती माहितीबाबत एकमत होऊन अपील निकाली काढण्याबाबत उभय बाजूंचे एकमत झाल्याचे प्रपत्रात लेखी नमूद केले आहे. चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ०१ .९.२००८**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५८ + ३६३ + ६५० / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. शंकर रामदास विभूते<br>देवकर बिल्डिंग, आकाशवाडी, हडपसर, पुणे-२८ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | १. सचिव, सुभाष सामुदायिक सहकारी शेतकी संघ लि. मांजरी बु. ता. हवेली, जि. पुणे<br>२. उप निबंधक सहकारी संस्था, पुणे शहर-४ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | १. उप निबंधक सहकारी संस्था, पुणे शहर-४<br>२. जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, शिवाजीनगर, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. शंकर रामदास विभूते यांनी त्यांच्या सेवा विषय बाबींच्या संबंधात माहिती मागितली होती.

दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याचे दि. १.४.२००८ रोजी निधन झाल्याचे सचिव तथा सुभाष सामुदायिक सहकारी शेतकी संघ लि., मांजरी बु., ता. हवेली, जि. पुणे यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.** १०.६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. २२.८.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २७९/ सातारा | श्री. बाबुराव भगवंतराव गायकवाड मु.पो.लोहोम ता.खंडाळा, जि. सातारा | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन खंडाळा, जि. सातारा | पोलीस अधीक्षक, सातारा जिल्हा पोलीस मुख्यालय, जि. सातारा | चौकशी कोणी केली, जबाब कोणी घेतले इत्यादी बाबतची माहिती | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| २ | ६२ / सातारा | श्री. सोमनाथ बाबा शेळके, क्रांती टेलर्स, शिवाजी चौक, लोणंद, ता.खंडाळा, जि. सातारा | पोलीस निरीक्षक, लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा | उपविभागीय पोलीस अधिकारी, फलटण, ता. फलटण, जि. सातारा | दि. १२.१२.२००६ रोजी दाखल केलेल्या चंदन तस्करीबाबतच्या तक्रारी संबंधातील कार्यवाही बाबतची व तद्अनुषंगिक माहिती | अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ३ | २८० / सातारा | श्री. मधुकर मारुतीराव पंडीत, कृष्णा अपार्टमेंट, डी.एड.कालेज जवळ, लक्ष्मीगर, फलटण-४१५ ५२३ | जन महिती अधिकारी, डी.पी.ओ. विभाग नियंत्रक कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सातारा विभाग, सातारा. | विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सातारा विभाग, सातारा. | फलटण येथील आगार परिसरातील वाहन पार्कींग ठेवण्याबाबत व इतर तद्अनुषंगिक माहिती | माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले असल्याने एकमत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २८९ / सातारा | श्री. तुकाराम बाबुराव जाधव मु.कर्मवीर नगर, पो.एम.आय.डी. सी.सातारा, जि. सातारा | पोलीस उप निरीक्षक मायणी पोलीस स्टेशन, खटाव, जिल्हा सातारा | पोलीस अधीक्षक, जि. सातारा | दि. १.१०.२००७ रोजी लोकशाहीदिनी प्रतिबंधात्मक कार्यवाही करणेबाबत दिलेल्या अर्जाचे चौकशीकामी पोलीस उपनिरीक्षक यांनी घेतलेले जबाब व नोटिशीची नक्कलची प्रत मिळणेबाबत | माहितीबा[illegible] अपीलकर्त्य[illegible] समाधान झालेले असल्याने एकमत. |
| ५ | ३२१ / सातारा | श्री. काकासाहेब मलकार्जुन शिवशरण प्लॉट नं. ७०, अर्कशाळा नगर, गेंडामाळ नाक्याजवळ, सातारा. | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर / सांगली / सातारा | प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर | महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ९(१) नुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी मत्ता व दायित्व याबाबतचे विवरण सादर केले आहे काय याबाबतची माहिती | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ६ | ३०८ / सातारा | श्री. सुशांत सुभाष मोरे ४, केशर कॉम्प्लेक्स, ३४, पंताचा गोट, सातारा | सहाय्यक ग्रंथालय संचालक, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | सहाय्यक ग्रंथालय संचालक, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | पुणे विभागातील अनुदानित वाचनालय व ग्रंथालयाची जिल्हानिहाय नाव, पत्ता असलेली अध्यक्षांची यादी तसेच प्रत्येक वर्षी सरकारकडून जाहीर झालेल्या अनुदानाची रक्कम व दिलेले अनुदान | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |

विशेष अपील निर्गत कार्यक्रमामध्ये दि. २२.०८.२००८ रोजी वर नमूद केलेल्या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी परस्परांशी विचारविनिमय करुन अपेक्षित माहितीबाबत निष्कर्ष नमूद करावा असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे. त्यानुसार या घटकांमधील चर्चेअंती माहितीबाबत एकमत होऊन अपील निकाली काढण्याबाबत उभय बाजूंचे एकमत

झाल्याचं प्रपत्रात लेखी नमूद केले आहे. चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०६.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७९ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | सौ. निलीमा बाबुराव सरदेसाई<br>७४१/२, श्रीकृष्ण कॉलनी, ए वॉर्ड,<br>संभाजीनगर, स्टॅण्डजवळ, कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्य लेखापाल,<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त,<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | हजर |

नगररचना विभाग, कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडून दि. १०.३.२००० रोजी नगदी विभागातील लॉकरमध्ये नगररचना विभागाची जमा ठेवलेची नोंद केलेल्या रजिस्टरच्या पानांची प्रमाणित प्रत अपीलकर्त्या सौ. निलीमा बाबुराव सरदेसाई यांनी मागितली होती. त्यावर मुख्य लेखापाल यांनी दि. १०.८.२००७ च्या पत्राने १९९९-२००० चे नगदी जमा नोंद रजिस्टर सध्या उपलब्ध नसलेने माहिती देणे अडचणीचे आहे, असे उत्तर दिले. अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी १० दिवसात माहिती देण्याचा आदेश दि. ४.१०.२००७ रोजी दिला.

सर्व बाबींचा विचार करता अपीलकर्त्याची मागणी ही अत्यंत स्पष्ट असूनही माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याचेच दिसून येते, ही अत्यंत गंभीर बाब आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी व त्यांचे अधिनस्त माहिती देण्याबाबत जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांची गंभीर दोषांबाबत शिस्तभंगाची कारवाई आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी करावी व तसा अहवाल आयोगास सादर करावा.

३.	आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, यांनी सदर माहिती देणे संदर्भात खातेअंतर्गत आदेश निर्गमित करून अपिलीय प्राधिकारी यांचेकरवी अपीलकर्त्यास माहिती मिळवून देण्याची कार्यवाही करावी.

**पुणे**
**दि.** २२.९.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९७ + २९८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | ॲड. हेमचंद्र दौलत सोनवणे<br>रा. पिंपरे खुर्द, पो. निरा, ता.पुरंधर. जि.पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई<br>जि. सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी, सातारा, जि. सातारा | गैरहजर |

अपीलकर्ता ॲड. हेमचंद्र दौलत सोनवणे यांनी उपविभागीय अधिकारी, वाई यांचेकडे दोन स्वतंत्र अर्जाद्वारे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ व २५७ खाली मुदतीत अपील /अर्ज दाखल केले होते व ते दाखल करण्याच्या मुद्दयांवर फेटाळले, म्हणून अशी कायद्यात तरतूद आहे का ? याविषयी माहिती मागितली होती.

सदरची बाब ही महसुली न्यायालयाच्या निर्णयासंबंधी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही, हा अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १० ७.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.भास्कर आबासाहेब पाटील
मु.पो.आरग, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
श्री रेणुका शुगर्स लि.मोहननगर, आरग, ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०३ / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर विद्यमान-श्री.डी.एस.साळुंखे
तत्कालीन-श्री.एस.बी.थोरात

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.८.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | १. दै.पुढारी दि.१७.२.२००६ च्या जाहिरातीच्या प्रस्तावाप्रमाणे आपण आरग हद्दीतील गट नं.३३५,३३७,३४०,३४४ ते ३४८ मधील ३० एकर क्षेत्र दाखविले आहे. ही जमीन औद्योगिक बिगरशेती आहे का? असल्यास सरकारी दराप्रमाणे किंमत.<br>२. दि.३०.४.२००६ व ३.५.३००६ च्या जाहिराती प्रमाणे दुसरा प्रस्ताव सादर आहे. पहिला प्रस्ताव बदलण्याची कारणे, दुसऱ्या प्रस्तावातील जमीन औद्योगिक बिगरशेती आहे का? असल्यास सरकारी दराप्रमाणे किंमत.<br>३. दोन्ही प्रस्तावाला मोहनराव शिंदे सह.साखर कारखान्याकडून स्वांत्र मान्यता घेतली होती का, असल्यास संबंधित कागदपत्रे.<br>४. पहिल्या व दुसऱ्या प्रस्तावाची जागा, कॉलनीची जागा व कारखान्याचे इतर सर्व बांधकामे एकत्रित नकाशात दाखवून त्याची प्रत. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.भास्कर आबासाहेब पाटील यांनी श्री रेणुका शुगर्स लि., मोहननगर, आरग, ता.मिरज, जि.सांगली या कारखान्याच्या मद्यार्क निर्मिती प्रकल्पासंबंधीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रतिसाद न दिल्यामुळे श्री.पाटील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. त्यांनी माहिती देण्याबाबत कारखान्याला कळविले. परंतु आपला कारखाना खाजगी असून भाडे कराराने चालविण्यासाठी दिलेला आहे, कोणत्याही स्वरुपाची शासकीय मदत त्याला मिळत नाही, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (एच) मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येनुसार आपली कंपनी सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही व त्यामुळे हा कायदा आपल्याला लागू होत नाही, असे श्री रेणुका शुगर्स लि., मोहननगर, आरग, ता.वाळवा, जि.सांगली या कारखान्याच्या कार्यकारी संचालकांनी, अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना कळविले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी यांनी श्री.पाटील यांचे अपील फेटाळले. आयोगाने दि.१८.३.२००८ रोजी पुण्यात आयोजित केलेल्या 'विशेष अपील

निर्गत कार्यक्रमा'ला, तसेच दि.१४.५.२००८ रोजी घेतलेल्या सुनावणीलाही अपीलकर्ता उपस्थित नव्हते. त्यामुळे श्री रेणुका शुगर्स लि. सार्वजनिक प्राधिकरण ठरते की नाही, याबाबतची सप्रमाण स्पष्टता होऊ शकली नाही. मात्र या कारखान्यास शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान नसल्याचे अपिलीय प्राधिकारी श्री.डी.एस.साळुंखे यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.९.२००८**

सप्टेंबर-५०-५२